**प्रेसनोट** दिनांक ०७/०२/२०२४

**तलाठी सजा कोळोसे, ता.महाड, जि.रायगड येथील तलाठी महिला कर्मचारी यांना लाच मागणी प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घेतले ताब्यात.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंध विभाग/घटक** | रायगड. |
| **पोलीस ठाणे व गु.र.नं.** | महाड शहर पोलीस ठाणे, कॉ.गु.र.नं.१२/२०२४, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ व ७ अ प्रमाणे. |
| **लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | श्रीमती शिल्पा श्रीरंग पवार, वय–३३ वर्षे, तलाठी सजा कोळोसे ता.महाड, जि.रायगड(वर्ग–३) |
| **मागितलेल्या लाचेची रक्कम** | ६,०००/– रूपये. |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | निरंक |
| **थोडक्यात हकिगत** | यांतील तक्रारदार यांचे मौजे तळोशी व मौजे नांदगांव खुर्द, ता.महाड येथील वडिलोपार्जित शेतजमिनीचे ७/१२ उता–यावर कायदेशीर वारस म्हणुन तक्रारदार व त्यांचे कुटुंबियांचे नावाची नोंद करणेकरीता तक्रारदार यांनी लोकसेवक श्रीमती शिल्पा श्रीरंग पवार, तलाठी सजा कोळोसे, ता.महाड, जि.रायगड यांचेकडे दिलेला अर्ज प्रकरणामध्ये लोकसेविका हया रू.६,०००/– लाचेची मागणी करीत असल्याबाबत दि.२५/०१/२०२४ रोजी तक्रार प्राप्त झाली होती.<br>प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २५/०१/२०२४ रोजी पंच साक्षीदार यांचे समक्ष केलेल्या पडताळणी वेळी लोकसेविका यांनी तक्रारदार यांचेकडे ६,०००/– रूपये लाचेची मागणी करून, लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले म्हणून लाच मागणी प्रकरणी यांतील आरोपी लोकसेवक श्रीमती शिल्पा पवार, तलाठी यांचेविरूध्द गुन्हा दाखल करून ताब्यात घेण्यांत आले आहे. |

**मार्गदर्शक अधिकारी** – १) मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे
२) मा. श्री. महेश तरडे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे
३) मा. श्री.सुधाकर सुराडकर, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

---

**लाचलूचपत प्रतिबंध विभागातर्फे नागरीकांना अवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.**

**संपर्क पत्ता** :– **ला.प्र.वि.ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर ठाणे (प) ४०० ०६१.**
**संकेत स्थळ** :– **acbmaharashtra@mahapolice.gov.in**
**ई–मेल** :– **spacbthane@mahapolice.gov.in**
**ऑनलाईन तक्रार अॅप्लीकेशन** :– **acbmaharashtra.net**
**टोल फ्री कमांक** :– **१०६४,**
**दुरध्वनि कमांक** :– **०२२–२०८१३५९८/२०८१३५९९**
**व्हॉट्स अॅप कमांक** :– **९९३०९९७७००**
**अॅन्टी करप्शन ब्युरो, रायगड अलिबाग कार्यालय**
**दुरध्वनी कमांक** :– **०२१४१–२२२३३१**
**टोल फ्री कमांक** :– **१०६४**
**मोबाईल क.** :– **९८७०३३२२९१ (शशिकांत पाडावे),**
**९८२१२३३१६० (नवनाथ चौधरी )**
**ईमेल आयडी** :– **dyspacbraigad@gmail.com**

(नवनाथ चौधरी)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, रायगड–अलिबाग